# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**परभणी (जि.परभणी) पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक पदाचा गैरवापर करीत असल्याबाबत**

**(१) ४१८३ (१५-०१-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री. मुगलीकर यांच्याविरुध्द तेथील नागरीकांच्या अनेक तक्रारी असून ते आपल्या पदाचा गैरवापर निरपराध व्यक्तीविरुध्द खोटे गुन्हे नोंदविणे, न्यायालयाची परवानगी न घेता शासकीय कागदपत्रात खाडाखोड करणे, मानसिक व शारीरिक छळवणूक करणे इ.प्रकारच्या तक्रारी असल्यामुळे या पोलीस अधिकाऱ्यांची राज्य गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करुन त्यांना निलंबित करावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधींनी मा.राज्यपाल तसेच मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांचेकडे दिनांक १८ नोव्हेंबर, २०१४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व संबंधित पोलीस निरीक्षकांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) अशा प्रकारचे निवेदन / तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील समुद्र किनारपटटी लगत असलेल्या खाडीच्या मुखालगत ग्रोयांन्स पध्दतीने बंधारे बांधण्याबाबत**

**(२) ८४५३ (०६-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समुद्र किनारपटटी लगत असलेल्या खाडीच्या मुखालगत ग्रोयांन्स पध्दतीने बंधारे बांधण्याकरीता दिनांक ०४ डिसेंबर, २०१४ रोजी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) सद्य:स्थिती सातपाटी ता.पालघर येथे ग्रोयान्स टाईप बंधारा बांधण्यासाठीच्या कामाचे केंद्रीय जलविद्युत संशोधन संस्था, पुणे (CWPRS) यांचेकडून सखोल अभ्यासाचे काम प्रगतीपथावर आहे. त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मार्वे ते मढच्या सागरी किना-यावर प्राथमिक सोई-सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(३) ८४५८ (०७-०४-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मार्वे ते मढच्या सागरी किना-यावर मुंबईसह संपूर्ण भारतातून पर्यटक येतात, त्या ठिकाणी किना-यावर प्राथमिक सोई-सुविधा, शौचालय, पिण्याचे पाणी तसेच पर्यटकांना बसण्यासाठी आसनव्यवस्था नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटकांना सोई-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१५) :**(१), (२) व (३) मुंबईतील मार्वे ते मढपर्यंतच्या सागरी किनाऱ्यामध्ये मार्वे, आक्सा व मढ असे एकूण ३ सागरी किनारे समाविष्ट असून सदर किनाऱ्यापैकी मार्वे किनाऱ्यावर चार आसनी (दोन स्त्रिया व दोन पुरुष) स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच आक्सा व मढ ही दोन स्थळ “क” वर्गीय पर्यटन स्थळे म्हणून घोषित केली आहेत. तसेच आक्सा समुद्र किनाऱ्यावर जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत पुरुषांसाठी ५ आसनी व स्त्रियांसाठी ५ आसनी शौचालय बांधण्यात आलेले आहे. मार्वे ते मढ सागरी किनाऱ्यांसाठी जिल्हा वार्षिक योजना पर्यटन स्थळांचा विकास या योजनेंतर्गत सन २०१०-११ ते २०१३-१४ या कालावधीत पुढील कामांसाठी रु.४८५.०० लक्ष नियधी मंजूर केला आहे. यापैकी काही कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

**कामाचा तपशील**

सौंदर्याकरणांतर्गत गार्डनची कामे, संरक्षण भिंत इंटरनल पेव्हमेंट रोड, शौचालय, पदपथ, वाहनतळ, सौदर्यीकरण, जॉगिंग ट्रॅक, गार्डन सुधारणा, पाण्याची कारंजे, पदपथ, गार्डनमधील आसनव्यवस्था, खेळाचे साहित्य, दिव्यांची सोय, पेअरगोला शेड, पाण्याची टाकी. इ.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात आक्सा चौपाटी/मार्वे चौपाटी व भाटी चौपाटी या स्थळांच्या ठिकाणी पुढील कामांसाठी रु. १३५.०० लक्ष मंजूर केले आहेत.

**कामाचा तपशील**

मार्वे व आक्सा बीचे येथे शौचालयाच्या बांधकामासाठी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळामार्फत अंदाजपत्रके मागविण्यात आलेली आहेत. याशिवाय सौदर्यीकरण/वाहनतळ/पाण्याची टाकी/पाईपलाईन/पोलीस चौकी/प्रवेशद्वार/सुरक्षा चौकी, पदपथ मार्ग, पेव्हर ब्लॉक या कामांचाही समावेश आहे.

---

**नक्षलवादी परिसरातील जीपीएस ट्रॅकर पुरविण्याबाबतची निविदेबाबत**

**(४) ८५७३ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलवादी परिसरातील जीपीएस ट्रॅकर पुरविण्याबाबतची मे.मधूराज इंटरप्राईसेची निविदा माहे मार्च, २०१४ मध्ये मान्य केल्यानंतर प्रत्यक्ष कार्यादेश देण्यासाठी १५ दिवस घेण्यात आले याबाबत संबंधित पुरवठादाराने एका वरिष्ठ आयपीएस अधिका-याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पुराव्यासह तक्रार केलेली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ओहत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) या प्रकरणी श्री.राजेंद्र वाघ, मेसर्स. मधुराज एंटरप्रायजेस यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केलेल्या दिनांक २९.११.२०१४ च्या तक्रारीबाबत त्यांचे स्तरावर प्राथमिक चौकशी सुरु आहे.

---

**राज्यातील सामाजिक-राजकीय आंदोलकांवरील खटले मागे घेण्याच्या निर्णयाबाबत**

**(५) ८६४७ (०६-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर),**

**डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक-राजकीय आंदोलकांवरील दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ पर्यंतचे खटले मागे घेण्याबाबतचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ मध्ये राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंतच किती जणांवरचे असे खटले मागे घेण्यात आले वा येत आहेत,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१५) :**(१) होय.

(२) राजकीय व सामाजिक आंदोलनातील प्रलंबित खटले मागे घेण्याबाबत दि.१३.१.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील नमूद निकषांची पुर्तता करण्यात आलेली एकूण १०७० खटले मा.न्यायालयातून मागे घेण्यात आली आहेत. उर्वरित खटल्यासंदर्भात छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोवाड (जि.कोल्हापूर) येथे पोलीस स्टेशन उभारण्याबाबत

**(६) ८७६३ (०६-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोवाड (जि.कोल्हापूर) येथे पोलीस स्टेशन उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पाळधी (ता. धरणगांव, जि. जळगांव) येथे वाढीव पोलिस कर्मचारी तसेच पोलिस निरिक्षकांचे पद निर्माण करण्याबाबत

**(७) ८९१२ (०६-०४-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळधी (ता. धरणगांव, जि. जळगांव) येथे सद्यःस्थितीत पोलिस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिका-यांच्या अखत्यारितील दूरक्षेत्र पोलिस ठाणे कार्यरत असून पोलिस ठाण्याच्या हद्दीत २५ ते ३० खेडी असून येथील एकूण लोकसंख्या १ लाखांच्या जवळपास आहे तसेच सदर पोलिस ठाणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या लगत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दूरक्षेत्र पोलिस ठाणे अद्ययावत करुन येथे वाढीव पोलिस कर्मचारी तसेच पोलिस निरिक्षकांचे पद निर्माण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी वरिष्ठ पोलिस अधिका-यांकडे गेल्या वर्षभरात अनेक वेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५) :**(१) सदर ठिकाणी १- सहाय्यक पोलीस निरीक्षक व १२- पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. दुरक्षेत्र अंतर्गत २७ खेडी असून लोकसंख्या अंदाजे ४०,००० आहे. तसेच हे दुरक्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.६ च्या लगत असून राष्ट्रीय महामार्ग अंदाजे ११ कि.मी. पाळधी हद्दीत येतो.
(२) होय.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटी दरम्यान लोकप्रतिनिधींनी व नागरिकांनी तोंडी मागणी केलेली आहे.
(३) पोलीस दलातील ६१,४९४ पदनिर्मितीच्या प्रस्तावामध्ये पोलीस अधिक्षक, जळगाव यांचे अधिनस्त विविध संवर्ग व विविध शाखाकरिता १२६३ पदे प्रस्तावित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेयशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या २३ आरोपिंविरोधात लावलेला मोक्का कायदा विशेष न्यायालयाने रद्द केल्याबाबत

**(८) ८९२५ (०७-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचा आरोप असलेल्या २३ आरोपिंविरोधात लावलेला मोक्का कायदा विशेष न्यायालयाने रद्द केल्याचे डिसेंबर, २०१४ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विशेष न्यायालयाने आरोपी विरोधातील मोक्का रद्द करण्याची कारणे काय आहेत, तसेच पोलिसांच्या तपासामध्ये कमतरता आहे काय,
(३) असल्यास, पोलिस न्यायालयात आपली बाजू पुन्हा मांडणार आहेत काय,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

मा.विशेष मोक्का न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २४.१२.२०१४ च्या आदेशान्वये सदर खटला सत्र न्यायालयाकडे वर्ग केला आहे.

(३) मा.विशेष मोक्का न्यायालयाच्या आदेशाविरोधात दिनांक १३.०१.२०१५ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.५६/२०१५ दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मलठण (ता.फलटण, जि.सातारा) येथील शिवपार्वती मंदिरातील ऐवज चोरीस गेल्याबाबत**

**(९) ८९४९ (०६-०४-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप सोपल (बार्शी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलठण (ता.फलटण, जि.सातारा) येथील महतपुरा पेठेतील शिवपार्वती मंदिरातील मुर्तीचे सोन्या-चांदीचे दागिने व पुजा-याच्या घरातील रोकड व मोबाईल असा सुमारे एक लाख रुपयांचा ऐवज चोरानी चोरुन नेल्याची घटना माहे जानेवारी २०१५ च्या पहिल्या सप्ताहात घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) प्रश्नात नमूद चोरीची घटना दि.२५/१२/१४ दरम्यान घडली असून त्यात रु.७९०००/- किमतीची दागिने, मोबाईल व रोख रक्कमेचा समावेश असून प्राप्त तक्रारीवरुन फलटण शहर पोलीस स्टेशन, जि.सातारा येथे गु.र.नं. २२६/२०१४ भा.द.वि. कलम ३७९, ३८० प्रमाणे दि.२६/१२/१४ रोजी गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) उक्त नमूद गुन्ह्याचा तपास फलटण शहर पोलीसामार्फत सुरु आहे. पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा करुन आजुबाजूला चौकशी केली तसेच जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील पोलीस स्टेशनला तपास याद्या पाठविल्या, रेकॉर्डवरील गुन्हेगाराची तपासणी केली, त्याच्या घरझडत्या घेतल्या, गुप्त बातमीद्वारेही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला तथापि गुन्ह्यातील चोरट्याबाबत तसेच चोरीस गेलेल्या मालाबाबत काही उपयुक्त माहिती मिळाली नाही. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे, पालघर, नवी मुबईमध्ये नवीन जलमार्ग सुरु करण्याबाबत.**

**(१०) ९०५१ (०६-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पालघर, नवी मुंबईमध्ये वाढती लोकसंख्या व अपुरी व गैरसोईची रस्तेवाहतूक व्यवस्था असल्याने या तीनही जिल्हामध्ये जनतेच्या सोईसाठी जलवाहतुकीला प्राधान्य देण्यासाठी, ठोणे - गायमुख, भाईदर खाडीमार्ग- वसई -गोराई-बोरावली -मुंबई असा नवीन जलमार्ग सुरु करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जलमार्गाची सद्यस्थिती काय आहे,

(३) सदरहू जलमार्ग वाहतूक निश्चितपणे कीती कालावधीत सूरु होईल ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१५) :**(१) होय.

(२) मार्वे-मनोरी, बोरीवली-गोराई, भाईदर-वसई, विरार-दातीवरे (पालघर) या ठिकाणांदरम्यान रो-रो सेवा सुरु करण्याच्या प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

ठाणे परिसरातील गायमुख येथील पर्यटन स्थळाचे विकासाकरिता रु.१३.०८ कोटी इतक्या अंदाजपत्रकास ठाणे महानगरपालिकेकडून प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

नायगाव, ता.वसई येथील प्रवासी जेट्टीच्या दुरुस्तीच्या कामाची निवीदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

जैसलपार्क चौपाटी, भाईंदर (पुर्व) येथील नवी जेटटीची बांधकामपुर्ण झाले आहे.

मार्वे, गोराई खाडीतून सुरळीत प्रवासी वाहतुक करण्याच्या दृष्टीकोनातून तेथील नौकवहन मार्गातील गाळ काढण्याचे काम प्रगतीपथावर आहे. मार्वे येथील नवीन प्रवासी जेटीचे बांधकाम चालू आर्थिक वर्षात हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) सन २०१७ अखरे पर्यंत जलवाहतूक कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे.

---

**नाशिक शहरामध्ये विशेष करून सिडको, सातपुर या भागामध्ये दिवसेदिवस गुन्हेगारीचे प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(११) ९२०८ (०७-०४-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरामध्ये विशेष करून सिडको, सातपुर या भागामध्ये दिवसेदिवस गुन्हेगारीचे प्रमाणात वाढ होत असल्याची बाब माहे जानेवारी २०१५ मध्ये उघडकीस आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे प्रकार वारंवार घडत असतांना पोलिस यंत्रणेचा याकडे दुर्लक्ष होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) नाशिक शहरात सन २०१३ मध्ये एकुण ३०३७, सन २०१४ मध्ये ३१६४, व सन २०१५ मध्ये मार्च, अखेर ८४९ गुन्हे दाखल असुन गुन्हेगारी नियंत्रणात आहे.
(२) हे खरे नाही.
(३) गुन्हेगारी प्रवृत्तीस प्रतिबंध व्हावा यासाठी पोलीस ठाणे हद्दीत अचानक कोम्बींग ऑपरेशन, ऑलआउट ऑपरेशन, झोपडपट्टी चेकींग, तडीपार गुन्हेगार चेक करणे, रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर नियमीत व प्रभावीपणे प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे, हॉटेल/लॉजेस चेक करुन त्याद्वारे गुन्हेगार चेक करणे अशी मोहीम पोलीस यंत्रणेकडून राबविण्यात येते. तसेच प्रतिबंधक कारवाई करुन गुन्हेगारी नियंत्रणात ठेवण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात आहेत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**उल्हानगरातील (जि.ठाणे)येथील शासकीय बाल वसतीगृहातून विद्यार्थी गायब झाल्याबाबत**

**(१२) ९६४७ (०८-०४-२०१५). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील शासकीय बाल वसतीगृहातून दिनांक १० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास ४ विद्यार्थी गायब झाल्याची तक्रार विठ्ठलवाडी पोलीस स्थानकात नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मुलाचा तपास पोलीसांना लागला आहे काय वा तपास कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :**(१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ ४ उल्हासनगर मधील विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील शासकीय सुधार गृहातील ३ विद्यार्थ्यांना कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण करुन नेले म्हणून विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन गुरक्र.२७७/१४ भादंविसं कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर मुलांचा तपास पोलीसांना लागला नसून सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## "राजाशिवछत्रपती" या ग्रंथातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलचा बदनामीचा मजकूर वगळण्याबाबत

**(१३) १०६२४ (०८-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल "राजाशिवछत्रपती" या ग्रंथालयातील पान नं.१२५ व १२६ या दोन पानांवर राजेंच्या बदनामीचा मजकूर नमूद केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित मजकूर उक्त ग्रंथालयातून वगळण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१५) :**(१) व (२) हे खरे नाही.

श्री.बाबासाहेब पुरंदरे लिखित "राजा शिवछत्रपती" या ग्रंथाच्या पृ.क्र.१२५ व पृ.क्र.१२६ वरील मजकूर आक्षेपार्ह वाटत नाही. त्यामुळे सदर मजकूर पुस्तकांतून वगळणे अथवा प्रस्तुत प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर मोठी अवजड वाहने लेनमध्ये लेनकटींग करीत असल्याने होत असलेले अपघात

**(१४) ११०४७ (०७-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर मोठी अवजड वाहने सर्रासपणे हलक्या वाहनांच्या लेनमध्ये लेनकटींग करत असल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असून दिनांक २६ डिसेंबर, २०१४ रोजी व त्यासुमारास तीन बसची टक्कर होऊन गंभीर अपघातामुळे सदरचा द्रुतगती मार्ग अडीच तास ठप्प झालेला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, रस्त्यावर बेशिस्त वाहतुकीमुळे अपघातांचे वाढते प्रमाण होत असलेली जिवीत तथा वित्तहानी या समस्याच विचार करता लवकरात लवकर उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०१५) :**(१) दि. २६.१२.२०१४ रोजी तीन बसेसचा अपघात झाला होता. तथापि, वाहतूक ठप्प झाली नव्हती. अपघातामुळे द्रुतगती महामार्गाची एक लेन बंद होती आणि वाहतूक संथगतीने सुरु होती.

(२) दि. २६.१२.२०१४ रोजी द्रुतगती महामार्गावर झालेल्या अपघाताबाबत लोणावळा पोलीस ठाणे येथे भाग ६ गु.र.नं. ६१/२०१४, भा.दं.वि.सं. कलम १७९ नुसार गुन्हा दाखल आहे.

(३) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अपघातांना आळा घालण्याकरिता महामार्ग पोलीस विभागाचे पळस्पे, बोरघाट, खंडाळा आणि वडगाव अशी महामार्ग पोलीस मदत केंद्र कार्यरत असून, महामार्ग पोलीसांकडून द्रुतगती मार्गावर सातत्याने गस्त घालून वाहतूकीचे नियमन केले जाते. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर जड-अवजड वाहनांची वाहतूक डाव्या लेनमधून करण्याबाबत जिल्हाधिकारी, रायगड आणि जिल्हाधिकारी, पुणे यांनी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. द्रुतगती महामार्गावर वाहतूक नियमांचे पालन, स्पीड/लेन कटींग इ.बाबतचे सूचना फलक लावण्यात आले आहेत. महामार्ग पोलीसांनी सन २००९ ते मार्च २०१५ पर्यंत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २,६२,१८५ वाहनांवर कारवाई करुन रु. ३,०३,८६,७९०/- एवढे तडजोड शुल्क वसुल केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अहमदनगर शहरात घरफोड्या, चोरीच्या घटनेत मोठया प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१५) ११३५६ (०६-०४-२०१५). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर शहरात मोठ्या प्रमाणात अवैध उद्योगधंदे सुरु असून घरफोड्या, चौ-या सोनसाखळी चोरीच्या घटनेत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनांना प्रतिबंध करणेबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) हे खरे नाही.

सन २०१३ च्या तुलनेत सन २०१४ अखेर घरफोडी, चोरी व सोनसाखळी गुन्ह्यात घट झालेली आहे.

(२) अहमदनगर शहरात चोरुन लपून अवैध धंदे करणाऱ्यांची माहिती काढून छापे घालून त्यांचेविरुध्द कारवाई केली जाते. त्यासाठी पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक तयार करण्यात आले आहेत. सन २०१३ मध्ये अवैध दारु सदराखाली २२२ केसेस करुन २४८ आरोपींना अटक केली व रु.८६५३६७/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सन २०१४ मध्ये याच सदराखाली १२७ केसेस करुन १५७ आरोपींना अटक केली व रु.३२२६१४/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अवैध जुगार सदराखाली सन २०१३ मध्ये २५३ केसेस करुन ६१० आरोपींना अटक केली व रु.३४५५१९९/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या सदराखाली सन २०१४ मध्ये १३५ केसेस करुन ४२३ आरोपींना अटक केली व रु.१२३४८२७/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासाअंती आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सन २०१३ मध्ये घरफोडीच्या दाखल १४७ गुन्ह्यापैकी १६ गुन्हे उघडकीस आणून रु.१४४४४३/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सन २०१४ मध्ये याच सदराखाली दाखल १९४ गुन्ह्यापैकी २४ गुन्हे उघडकीस आणून रु.३६१२००/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सन २०१३ मध्ये चोरीच्या दाखल ३९९ गुन्ह्यापैकी ९७ गुन्हे उघडकीस आणून रु.१,६१,२६,४३०/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सन २०१४ मध्ये याच सदराखाली दाखल २६३ गुन्ह्यापैकी ९८ गुन्हे उघडकीस आणून रु.८३,९५,५८२/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सन २०१३ मध्ये सोनसाखळीच्या दाखल ५९ गुन्ह्यापैकी २६ गुन्हे उघडकीस आणून रु.७३३७५०/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सन २०१४ मध्ये याच सदराखाली दाखल ४० गुन्ह्यापैकी ०९ गुन्हे उघडकीस आणून रु.१८५०००/- किमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.

अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी शहरात गस्त नेमण्यात येते महत्त्वाचे ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांचे पॉईंट नेमण्यात आले आहेत. त्याचबरोबर बीट मार्शल, पेट्रोलिंग कार्यरत आहे. संशयित व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची हालचाली व वास्तव्याची माहिती काढून त्यांचेविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कल्याण-डोंबिवली परिसरात सोनसाखळी चोरीचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(१६) ११४५८ (०७-०४-२०१५). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली परिसरात सोनसाखळी चोरीचे प्रमाण खूप वाढले असून गेल्या वर्षभरात ३३५ महिलांच्या दागिन्यांची चोरी झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकाराला आळा घालण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५)** :(१) ठाणे पोलीस आयुक्तालयातील, कल्याण डोंबिवली परिसरामध्ये सन २०१३ मध्ये ३२० पैकी १६१ गुन्हे उघड, सन २०१४ मध्ये ३३५ पैकी ११७ गुन्हे उघड, सन २०१५ मध्ये ३४ पैकी २ गुन्हे उघड याप्रमाणे सोनसाखळी आणि मंगळसुत्र चोरीच्या घटना घडलेल्या आहेत.

(२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील, कल्याण-डोंबिवली परिसरामध्ये सोनसाखळी चोरीस पायबंद घालण्याकरीता सदर परिमंडळात जास्तीत जास्त फिक्स, मोबाईल पेट्रोलिंग, पायी पेट्रोलिंग, नेमण्यात येत असुन अचानकपणे नाकाबंदी व कोम्बिंग ऑपरेशन राबवुन सोनसाखळी चोरी करणाऱ्यांना अटकाव करण्यात येत आहे.

तसेच सदर परिमंडळातील पोलीस ठाण्याचे हद्दीत अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याकरीता परिमंडळ तसेच पोलीस ठाणे स्तरावर शांतता व मोहल्ला कमिटी सदस्य, सोसायट्यांतील व चाळीतील रहिवाशी, अध्यक्ष व सदस्य, ज्येष्ठ नागरीक, महिला दक्षता सदस्य, ज्वेलर्स दुकानदार यांच्या वेळोवेळी बैठका घेवून त्यांना मार्गदर्शनपर सुचना देवुन स्वत:चे व इतरांचे सुरक्षीततेबाबत सतर्क व जागृत राहणेबाबत पोलीसांमार्फत आवाहन करण्यात येते.

तसेच परिमंडळातील पोलीस ठाण्यांचे हद्दीत मोक्याचे ठिकाणी तसेच रहिवाशी सोसायट्यांमध्ये रेल्वे स्टेशन, एस.टी. स्टँड, रिक्षा स्टँड, मॉल्स, नाट्यगृह, चित्रपटगृह, बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी नागरीकांना सतर्क व जागृत राहणेबाबत जाहीरातीचे फलक लावून नागरीकांना आवाहन करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्ह्यातील गोवर्धना, वाकद ता.रिसोड व मेडशी, किन्हीराजा ता.मालेगाव येथील पोलीस चौक्यांचे रुपांतर पोलिस स्टेशन मध्ये करण्याबाबत**

**(१७) ११५०९ (०६-०४-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवर्धना, वाकद ता.रिसोड व मेडशी, किन्हीराजा ता.मालेगाव (जि. वाशिम) येथील पोलीस चौक्यांचे रुपांतर पोलिस स्टेशन मध्ये करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील पोलीस दलातील दुसऱ्या टप्प्यातील १२२७९ पदे निर्मितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पोलीस चौक्याचे पोलिस स्टेशन मध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तंटामुक्ती अभियाना अंतर्गत पुरस्कार स्वरुपात दिल्या जाणा-या रोख रक्कमेच्या विनीयोगाबाबत तंटामुक्ती समितीला विचारात घेणेबाबत**

**(१८) ११५६९ (०८-०४-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंटामुक्ती अभियाना अंतर्गत ग्रामपंचायतींना रोख रक्कमेचा पुरस्कार दिला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या निधीच्या विनीयोगाच्या संदर्भात तंटामुक्त समितीला विचारात घेतले जाते का,

(३) विचारात घेतले जात नसल्यास तशा प्रकारचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(४) असल्यास, त्यावर शासनाने अंमलबजावणीच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१५) :**(१) होय.

(२) दि. १४ ऑगस्ट, २००८ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-७ मध्ये पुरस्कार रकमेच्या विनियोगाबाबत मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यामध्ये पुरस्काराच्या रकमेतून विविध उपक्रमासाठी खर्च करण्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला दिलेला आहे. ग्रामसभेत पुरस्कार रकमेच्या विनियोगाबाबत निर्णय घ्यावा. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याची आणि ग्रामसभेच्या निर्णयानुसार खर्च करुन त्यांचे हिशोब ठेवणे व ग्रामसभेला अहवाल सादर करणे आणि संबंधित शासकीय यंत्रणाना याबाबत आवश्यक ती माहिती पुरवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या ग्राम सेवकामार्फत तंटामुक्त गाव समितीची राहील, अशी तरतूद केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) दि.१४ ऑगस्ट २००८ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट-७ पुरस्कार रकमेचा विनियोगाबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार ग्रामपंचायतीकडून होत असलेल्या खर्चाची कालबध्द तपासणी संबंधित तहसिलदार, गट विकास अधिकारी, संबंधित पोलीस ठाण्याचे पोलीस प्रमुख आणि पुरस्कार रकमेचा विहित सुचनांनुसार विनियोग होईल याबाबत संबंधित तालुका समिती नियंत्रण ठेवते. ज्या प्रकरणात या सुचनांचे उल्लंघन झाले असल्याचे आढळून आल्यास, त्या प्रकरणात संबंधितांवर आवश्यक ती कारवाही तालुकास्तरीय समितीच्या शिफारशीवर जिल्हास्तरीय कार्यकारी समिती करते. त्याचप्रमाणे ग्रामपंचायतीच्या लेखा परिक्षणाबरोबर पुरस्कार निधीचे लेखा परिक्षण केले जाते. अशा प्रकारे पुरस्कार रकमेच्या विनियोगाची अंमलबजावणी केली जात आहे.

---

**अहमदपुर तालुक्यातील (जि.लातूर) किनगाव पोलीस ठाण्यात**
**फक्त २३ पोलीस कर्मचारी कार्यरत असल्याबाबत**

**(१९) ११७६८ (०६-०४-२०१५). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपुर तालुक्यातील (जि.लातूर) किनगाव पोलीस ठाण्याच्या हददीत तीन तालुक्यांतील ८३ गावांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस ठाण्याकडे फक्त २३ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुरेसे पोलीस बळ नसल्यामुळे या भागातील गुन्हेगारींवर नियंत्रण ठेवणे अशक्य होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पोलीस ठाण्यासाठी अधिक पदे मंजुर करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पोलीस स्टेशन किनगाव येथे एकूण मंजूर संख्याबळामध्ये सपोनि-१, पोउपनि-१ व २८ पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अजिंठा/फर्दापूर (जि.औरंगाबाद) येथील जगप्रसिध्द अजिंठा लेणी पाहण्यास येणा-या पर्यटकांची संख्या गेल्या वर्षभरात घटल्याबाबत**

**(२०) ११८०४ (०७-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अजिंठा/फर्दापूर, जि.औरंगाबाद येथील जगप्रसिध्द अजिंठा लेणी पाहण्यास येणा-या पर्यटकांची संख्या गेल्या वर्षभरात घटली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही लेणी पाहण्यासाठी येणा-या पर्यटकांची संख्या दरवर्षी ९ टक्यांनी वाढत असते परंतू यंदा ही वाढ झालीच नाही पर्यटकांची संख्या घटण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच पर्यटक वाढिवण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०६-२०१५) :**(१) होय, भारतीय पुरातत्व विभागाकडून प्राप्त झालेल्या गेल्या २ वर्षाची आकडेवारी पाहता पर्यटकांची संख्या घटली आहे.
(२) आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक व्यवस्था विस्कळीत होणे, रोग प्रसार-स्वॉईन फ्ल्यू इ., हवामानात मोठ्या प्रमाणात झालेला बदल, दुष्काळग्रस्त (ओला-सुका) परिस्थिती, प्रवास व हॉटेल व्यवसायात झालेली दरवाढ, पर्यटकांची बदललेली रुची, लोकसभा निवडणूक- २०१४, विधानसभा निवडणूक -२०१४ इ. कारणांमुळे पर्यटकांच्या संख्येत घट झालेली आहे.
(३) औरंगाबाद जिल्हा “पर्यटन जिल्हा” म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी, औरंगाबाद मार्फत औरंगाबाद जिल्हयाचा पर्यटनाचा विकासाचा बृहद् आराखडा तयार करण्यात आला आहे. केंद्र शासनाने विदेशात आयोजित केलेल्या रोड शोज् मध्ये सहभागी होऊन

प्रसिध्दी व प्रचालन करण्यात येत आहेत. सप्टेंबर, २०१५ मध्ये महाराष्ट्र इंटरनॅशनल ट्रॅव्हल मार्ट आयोजित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात मोठ्या प्रमाणात गावठी दारु विक्री केली जात असल्याबाबत**

**(२१) ११८०५ (०७-०४-२०१५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयात मोठ्या प्रमाणात गावठी दारु विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावठी दारुने अनेक लोकांचे संसार उध्दवस्त झाले असून दारु विक्री करणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) व (२) अहमदनगर जिल्हयातील चोरुन लपून चालणाऱ्या अवैध दारुबाबत बातमीदाराकडून माहिती काढून माहे जानेवारी, २०१५ मध्ये छापे टाकून मुंबई दारुबंदी कायद्यान्वये १६ अवैध धंदेवाईकावर कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये एकूण २८० लीटर रु. ९३४०/- किंमतीची गावठी दारु जप्त करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या अवैध धंद्याबाबत माहिती प्राप्त व्हावी म्हणून स्वतंत्र फोन नंबर प्रसिध्द करुन त्यावर माहिती देण्याबाबत नागरिकांना अवाहन केले आहे. मुंबई पोलीस अधिनियांतर्गत ९० नुसार अवैध धंद्याविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**सिन्नर (जि.नाशिक) पोलिस स्टेशनचे विभाजन करणेबाबत**

**(२२) ११८३५ (०६-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर (जि.नाशिक) पोलिस स्टेशन वरील कामाचा ताण लक्षात घेता पोलिस स्टेशनचे विभाजन करणेसाठीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभाजन करणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०१५) :** (१) होय.
(२) शासन निर्णय क्र. अेपीओ ३१११/प्र.क्र.१०७(अ)/पुर्बा-२/पोल-३, दि. ४.३.२०१४ अन्वये सिन्नर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नविन एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करण्याचा निर्णय

घेतला आहे. त्यानुसार हद्दनिश्चितीची अधिसूचना निर्गमित करण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालवणी मालाड (प) मुंबई येथील अब्दुल हमीन मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्याबाबत**

**(२३) ११९९७ (०४-०४-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी मालाड (प) मुंबई येथील अब्दुल हमीन मार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्यात यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी वरिष्ठ पोलिस निरिक्षक, परिवहन विभाग मालाड, मालवणी पोलीस ठाणे, मालाड (प) परिवहन अधिकारी, अंधेरी (प) मुंबई यांच्याकडे दिनांक १५.१.२०१४, ०१.०२.२०१४, ०६.०३.२०१४, ०५.०५.२०१४, ०४.०७.२०१४, ०९.०८.२०१४, २८.०८.२०१४, ०३.०९.२०१४, व २७.११.२०१४ रोजी वा त्या सुमारास वारंवार मागणी करुनही संबंधित अधिकाऱ्याने दुर्लक्ष केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे व संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, कोणती उपायायेजना केली तिचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१५) :**(१) मालवणी, मालाड (प) मुंबई येथील अब्दुल हमीद मार्गावरील वाहतुक कोंडीबाबत मालाड वाहतूक विभागास १५.१.२०१४, ५.५.२०१४ आणि २७.११२०१४ दिनांकित अर्ज/निवेदने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्याकडून प्राप्त झाली आहेत. या निवेदपाच्या अनुषंगाने वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) व (३) या मार्गावरील वाहतूक सुरळीत सुरु राहावी याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१. वाहतूकीस अडथळा करणाऱ्या कसुरदार वाहनचालकांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे.

२. या मार्गावर वाहने रस्त्यावरुन काढण्याकरीता सार्वजनिक संपर्क सिस्टीमद्‌वारे नागरीकांना अवाहन केले जाते.

३. सदर मार्गास समांतर मार्ग तयार करण्यात येत आहे.

४. या मार्गावरील शाळा, हॉस्पटील, वेग मर्यादा याबाबत सूचना फलक लावण्यात आलेले आहेत.

५. मार्वे रोड व मालवणी गेट १ ते ८ या विभागात वाहतूकीच्या नियमनाकरिता १ पोलीस उपनिरीक्षक, ४ पोलीस अंमलदारांची नेमणुक केली असून दोन रायडर्स गस्त घालण्यासाठी नेमण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली परिसरात कल्याण बंदरालगत**
**जल प्रवासाकरीता जेट्टी बांधण्याबाबत**

**(२४) १२०२६ (०७-०४-२०१५). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली परिसरातील वाहतुकीची भेडसावणारी समस्या निर्माण झाल्यामुळे अपुऱ्या सोयी असल्यामुळे कल्याण बंदरालगत जल प्रवासाकरीता जेट्टी बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची जेट्टी बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तोंडवळी-वायंगणी**
**येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याबाबत**

**(२५) १२१११९ (०७-०४-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तोंडवळी-वायंगणी येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री दिनांक २३ जानेवारी, २०१५ मध्ये सिंधू पर्यटन महोत्सवात जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणासाठी किती एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पाला किती खर्च येणार असून हा प्रकल्प केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१५) :**(१) होय.

(२) सदर प्रकल्पासाठी सुमारे ३५० एकर जागा संपादित करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी अंदाजे रु.१२० कोटी निधी आवश्यक असून सदर निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला वितरीत करण्यात आला आहे. प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

---

**राज्यात गुटखाबंदी असूनही गुटखा सर्रासपणे विकला जात असल्याबाबत**

**(२६) १२३१२ (०७-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असुनही दि. ०६/०१/२०१५ रोजी जळगाव येथील बळीराम पेठेतील एका अरुंद गल्लीत एमएच- १५, एजी- ३६८७ या ट्रॅकमधुन आलेल्या गुटख्यांची पोती रिक्षा क्र. एमएच - १९, एस- ७३४५ या रिक्षात भरण्याचे काम सुरु असतांना माध्यम प्रतिनिधींनी पकडला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुटखाबंदी असूनही गुटखा हा सर्रासपणे सर्वत्र विकला जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गुटखा विक्री करण्या-यांवर अन्न व औषध प्रशासन व पोलीस प्रशासन कोणती कारवाई करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) होय,

प्रश्नात नमूद केल्याप्रमाणे अन्न सुरक्षा विभागाचे अधिकाऱ्यासह स्थानिक गुन्हे शाखा जळगाव पोलीस पथकाने प्रतिबंधीत गुटखा, ट्रक व रिक्षा पकडून गु.र.नं.०२/१५ भा.द.वि. कलम १८८, २७२, २७३, ३२८, ५११, ३४ तसेच अन्न सुरक्षा कायदा २००६ खाली गुन्हा दाखल करुन कारवाई केली आहे.

(२) नाही,

तथापि नजर चुकवून गुटखा विक्री/साठा करणाऱ्या इसमाविरुध्द सन २०१४ मध्ये १४ गुन्हे दाखल करुन ६९ आरोपींना अटक करुन रु.६३००५३४/- किमतीचा प्रतिबंधीत गुटखा जप्त केला आहे. सन २०१५ मध्ये आज अखेर ६ गुन्हे दाखल करुन ९ आरोपींना अटक करुन रु.९०३९४०/- चा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

(३) अन्न व औषध प्रशासन याविभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेवून वेळोवेळी गुप्त बातमीदारामार्फत माहिती काढून छापे टाकून आरोपीतांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले असून भविष्यात देखील गुटख्याचा अवैध रित्या व्यापार करणारे, वाहतुक करणारे, साठवणूक करणारे, विक्री करणारे इसमांबाबत माहिती काढून जास्तीत जास्त छापे टाकून कारवाई करण्यात येत आहे.

---

**शेलुबाजार, अनसिंग, ता.जि.वाशिम येथे नवीन पोलीस चौकी सुरु करण्याबाबत**

**(२७) १२७०४ (०७-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलुबाजार, अनसिंग, ता.जि.वाशिम येथे वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याकरिता नवीन पोलीस चौकी सुरु करण्याची मागणी ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीनुसार सदरहू नवीन पोलीस चौकी सुरु करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :**(१) हे खरे नाही.

पोलीस ठाणे मंगरुळपीर अंतर्गत शेलुबाजार येथे पोलीस चौकी कार्यरत असून अनसिंग ता.जि.वाशिम येथे पोलीस ठाणे कार्यरत आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील पाचगावातील राजर्षी शाहू आश्रमशाळेतील विद्यार्थी सुरज पवार यांचा झालेला मृत्यू

**(२८) १२८४९ (०८-०४-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पाचगावातील राजर्षी शाहू आश्रमशाळेतील अधिक्षकांनी चोरीचा आरोप केल्यामुळे स्वत:ला पेटवून घेतलेला विद्यार्थी सुरज पवार यांचा दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) व (२) प्रश्नात नमूद विद्यार्थ्यांचे त्याचे दोन मित्र व आश्रम शाळा प्रमुख (रेक्टर) यांच्या त्रासामुळे पेटवून घेतलेबाबत गांधीनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ०१/२०१५, भा.द.वि. कलम ११६, ३२३, ३५२, ३५५, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे दि.०२/०१/१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. उपचारादरम्यान सदर विद्यार्थ्यांचा दिनांक ०८/०१/१५ रोजी मृत्यू झाल्याने गुन्ह्यात भा.दं.वि. कलम ३०६ चा समावेश करण्यात आला.

सदर गुन्ह्यातील निष्पन्न आरोपी रेक्टर यांना अटक करण्यात आली असून व इतर विधी संघर्ष बालक यांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

## सौदर्य प्रसाधने बनविणाऱ्या नामांकित कंपनीच्या बनावट उत्पादनाची विक्री करण्यात आल्याबाबत

**(२९) १३०४४ (०८-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौदर्य प्रसाधने बनविणाऱ्या प्रॉक्टर ॲड गॅम्बल प्रा.लि. आणि लोरीयाल प्रा.लि. नामांकित कंपनीच्या बनावट उत्पादनाची विक्री करणा-या क्रॉफर्ड मार्केमधील तीन दुकानांवर पोलीसांनी

धाड टाकून ३ लाख ५ हजार रुपये किंमतीची बनावट उत्पादने जप्त केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उपरोक्त प्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलीस स्टेशन येथे स्था.ख.क्र.५/१५ कॉपीराईट ॲक्ट कलम ५१, ६३ सह ट्रेडमार्क ॲक्ट कलम १०३, १०४ अन्वये गुन्हा नोंद करुन तीन आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

प्रकरणी दुकानांवर छापा टाकुन सुमारे रुपये ३,५९,९८८/- किंमतीची बनावट उत्पादने जप्त करण्यात आलेली आहेत.

जप्त करण्यात आलेल्या बनावट उत्पादनातील नमुना उत्पादनांची पडताळणी होवून संबंधित कंपन्याकडून अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. प्रस्तुत प्रकरणी नोंद गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक पोलीस आयुक्तालयातंर्गत सात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्याबाबत

**(३०) १३६१७ (०७-०४-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक पोलीस आयुक्तांतर्गत सात नवीन पोलीस ठाणे स्थापन करण्यासाठी पोलीस आयुक्त नाशिक यांनी शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नाशिक पोलीस आयुक्तालयातील १ अतिरिक्त पोलीस आयुक्त, पाच सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्यासह अधिकारी वर्गाची बहुतांश पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत, शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१५) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) पोलीस अधिक्षक, नाशिक शहर यांचे अधिनस्त शासन निर्णय दि. ४.३.२०१४ अन्वये पंचवटी पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नविन म्हसरुळ पोलीस ठाणे व भद्रकाली पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन मुंबई नाका पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत शासनाकडून मान्यता मिळालेली असून दि. ३.६.२०१५ अन्वये अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यात मोठ्या प्रमाणात घरफोडी, दारु, जुगार, मटका, अवैध वाहतुक सुरु असल्याबाबत**

**(३१) १३७८७ (०७-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर व मंगळवेढा (जि.सोलापूर) या तालुक्यात मोठ्या प्रमाणात घरफोडी, दारु, जुगार, मटका, अवैध वाहतुक हे व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असून दिवसेंदिवस हे प्रकार वाढतच असल्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे व दहशतीचे तसेच चिंतेचे वातावरण पसरले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकार रोखण्याबाबत तसेच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

नमूद क्षेत्रात सन २०१४ मध्ये चोरुन लपून चालणाऱ्या अवैध धंद्यांवर कारवाई करण्यात आली असून त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

घरफोडीच्या ४३ दाखल गुन्हापैकी ६ गुन्हे उघडकीस आणून सुमारे १४१५००/- रु. किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध दारु च्या ५७६ प्रकरणात रु. ७६३२६४/- च्या मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कालावधीत जुगाराच्या ८० प्रकरणात १३२ आरोपींना अटक करुन रु. ६५६२६/- किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध प्रवासी वाहतुकीचे ५१३ गुन्हे दाखल करुन रु. ४९५९००/- दंड आकारण्यात आला आहे.

(२) चोरुन चालणाऱ्या अवैध धंधाची माहिती काढून वेळोवेळी छापे टाकून कारवाई करण्यात आली आहे. दारुबंदीचे एकापेक्षा जास्त गुन्हे असणारे लोकांवर मुंबई दारुबंदी ९० प्रमाणे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. तसेच सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी अवैध धंदे चालणार नाही याची खबरदारी घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. अवैध धंधाबाबतची माहिती प्राप्त झाल्यानंतर लगेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे अधिकारी व कर्मचारी पाठवून कारवाई करण्यात येते. अवैध प्रवासी वाहतूकच्या एका वाहनांवर एका पेक्षा जास्त केसेस झालेल्या आहेत अशा वाहनाचे निलंबनाचे प्रस्ताव पाठवून वाहन निलंबनाची कारवाई करण्यात येते.

अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी रात्रौगस्त नेमण्यात येते बाजारपेठ व महत्वाचे ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांचे पॉईट नेमण्यात आले आहेत. त्याचबरोबर दरोडा प्रतिबंधक, पेट्रोलिंग कार्यरत आहे बँका, पतसंस्था सराफी दुकानात सीसीटीव्ही कॅमेरे व अलार्म बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संशयित व गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची हालचाली व वास्तव्याची माहिती काढून त्यांचेविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. गावागावामध्ये ग्राम सुरक्षा दल स्थापन करुन त्यांना काठ्या, शिट्टयाचे वाटप करण्यात आले अहे व त्याद्वारे रात्रोगस्त करण्यात येते.

(३) विलंब झालेला नाही.

**कराड, (जि.सातारा) येथे निवडणुकीसाठी कर्तव्यावर असताना संतोष निवृत्ती गवळी पोलीस नाईक मृत झाल्याबाबत**

**(३२) १३९२७ (०८-०४-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड, (जि.सातारा) येथे सन २०१४ मधील विधानसभा निवडणुकीसाठी कर्तव्यावर असताना व तत्कालीन मा.मुख्यमंत्री दौऱ्यावर असताना वाहतूक नियमन करणाऱ्या संतोष निवृत्ती गवळी पोलीस नाईक यांचा दिनांक २४ सप्टेंबर, २०१४ रोजी कंटेनरने धडक दिल्याने मृत झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेत कर्तव्यावर असतांना मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे मागणी केली असून तद्नुसार मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेत कर्तव्यावर असताना मृत झालेल्या मृताच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी म्हणून महामार्ग वाहतुक शाखा, कराड यांनी जा.क्र.३२५/२०१४ दि. ३१/१०/२०१४ अन्वये मा.जिल्हा अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केल्याची माहिती मिळाली आहे. तसेच मृत पोलीस कर्मचाऱ्यांचे वारसांना विम्याचे क्लेम कामी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे पोलीस विभागाकडून पुरविण्यात आलेली आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मधुस्वप्न बाजार पेठ, आगाशी (ता.वसई, जि.ठाणे) येथील मिनाक्षी ज्वेलर्सवर दरोडा पडल्यांबाबत**

**(३३) १४०७८ (०८-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मधुस्वप्न बाजार पेठ, आगाशी (ता.वसई, जि.ठाणे) येथील मिनाक्षी ज्वेलर्सवर दिनांक २८ जून, २०१४ रोजी मध्यरात्री दरोडा पडला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व सोन्या-चांदिचे दागीने व रोख रक्कम दिड कोटी रुपयांचा मुद्देमाल चोरला असल्याची तक्रार देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१५) :**(१) मिनाक्षी ज्वेलर्स या दुकानात दिनांक २८.०६.२०१४ ते दिनांक २९.०६.२०१४ च्या दरम्यान दरोडा पडलेला नसून घरफोडी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर घरफोडी चोरीच्या गुन्ह्यात १,१०,००,०००/- रुपयेचा सोन्या चांदीचा ऐवज चोरीस गेला आहे.

(३) सदर प्रकरणी अर्नाळा पोलीस स्टेशन येथे गुरक्र९०/२०१४ भादंवि कलम ४५४,४५७, ३८०, ३४ प्रमाणे दिनांक ०९.०६.२०१४ रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आलेली असून ३२९ ग्रॅम सोन्याची लगड किंमत सुमारे रुपये ८,८८,०००/- चा माल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरच्या गुन्ह्यातील इतर पाहिजे आरोपींच शोध चालू असून सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील उच्च न्यायालयासह विविध न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधांच्या अभावामुळे न्यायालयीन कर्मचारी, याचिकाकर्ते यांची होत असलेली गैरसोय

**(३४) १४३२७ (१०-०४-२०१५). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च न्यायालयासह विविध न्यायालयांमध्ये पायाभूत सुविधांच्या अभावामुळे न्यायालयीन कर्मचारी, याचिकाकर्ते यांची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पायाभूत सुविधांसाठी ५.३७ कोटी रुपयांचा निधी अर्थ विभागाकडून मंजूर होऊन तो अद्याप देण्यात आला नाही तसेच पिण्याचे शुध्द पाणी उपलब्ध व्हावे याकरीता वॉटर प्युरिफायर सार्वजनिक बांधकाम विभागाने खरेदी करुनही ते लावले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सामान तपासणारे स्कॅनर बसविण्यात न आल्याने न्यायाधीश, कर्मचारी, याचिकाकर्ते यांची सुरक्षा धोक्यात आल्याने शासनातर्फे आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१५) :**(१) होय.

(२) राज्यातील न्यायालयामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने मा.उच्च न्यायालयाच्या मागणीनुसार राज्यातील विविध न्यायालयांमध्ये न्यायिक अधिकारी/कर्मचारी, अधिवक्ता आणि पक्षकारांसाठी (महिला व पुरुषांसाठी स्वतंत्रणे व अंपगासाठी) पुरेशी प्रसाधनगृहे व बैठक व्यवस्थेकरीता शासन ज्ञापन क्र. याचिका-१२१४/प्र.क्र.२१४/कार्या-११,

दि.२१ एप्रिल, २०१५ अन्वये रु. १३,६४,३९,०००/- इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

शासनाने विविध जिल्हा व तालुका न्यायालयाच्या ठिकाणी ३२५ वॉटर कुलर्स व २६५ वॉटर प्युरीफायर उपलब्ध करुन दिले आहेत. साधारण १२६ वॉटर कुलर्स व ११० प्युरीफायर बसविण्यात आले आहेत.

(३) सन २०१३-१४ मध्ये ४ नग Fixed X-Ray Baggage Scanner खरेदी करण्याकरीता अनुदान मंजूर करण्यात आले होते. तथापि निवदिा प्रक्रिया दि. ३१/३/२०१४ पर्यंत पूर्ण न झाल्यामुळे निधी व्यपगत झाला. सन २०१३-१४ मध्ये चालू केलेली निविदा प्रक्रिया सन २०१४-१५ मध्ये चालू ठेवण्यात आली त्यापैकी पात्र ठरलेल्या निविदाकारांच्या निविदा उघडण्यात आल्या. सर्वात कमी निविदाराची निविदाही रुपये पाच लाखापेक्षा जास्त असल्याने दि.२०/५/२००९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार खरेदी समितीने सदर प्रकरण राज्य स्तरीय खरेदी समितीसमोर ठेवले. राज्य स्तरीय खरेदी समितीचे ४ Fixed X-Ray Baggage Scanner खरेदीचे पत्रदिनांक १/४/२०१५ रोजी प्राप्त झाले. तथापी, सन २०१४-१५ चा निधी दि.३१/३/२०१५ रोजी व्यपगत झाला त्यामुळे सदर खरेदी करता आला नाही.

राज्या वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत ४ नग व आधुनिकीकरण (पुनर्जिवीत योजना) अंतर्गत १ नग, असे एकूण ५ नग Fixed X-Ray Baggage Scanner खरेदी करण्याचे प्रस्तावित असून शासनाकडे मंजूरीकरीता प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मंजूरी प्राप्त होताच खरेदीची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील आझाद लेन, सी.डी.बर्फीवाला, दादाभाई रोड, लिंक रोड येथे अनधिकृतपणे जड वाहने मोठया प्रमाणात पार्क करीत असल्याबाबत**

**(३५) १४५९३ (०७-०४-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील आझाद लेन, सी.डी.बर्फीवाला, दादाभाई रोड, लिंक रोड मध्ये मोठया प्रमाणात अनधिकृतपणे जड वाहने मोठया प्रमाणात पार्क करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावर अनधिकृत पार्क केलेल्या जड वाहनांमुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गावरील अनधिकृतपणे पार्किंग केलेली जड वाहने कायमची हटविण्याबाबत शासनातर्फे कोणत्या प्रकारची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर मार्गावरील अनधिकृत जड वाहनांच्या पार्किंगमुळे काही ठिकाणी वाहतूकीस अडथळा निर्माण होतो.

या मार्गाच्याकडेला उभी राहणारी हलकी व जड वाहने त्या परिसरातील रहिवाशांची आहेत. या वाहन मालकांना भारतीय दंड विधान संहिता, कलम १४९ नोटिसा देण्यात आल्या आहेत. तसेच, या मार्गावर वाहतूक नियमनासाठी ठिकठिकाणी वाहतूक पोलीस अंमलदारांची नेमणूक केली जाते. अनधिकृतरित्या पार्क केलेल्या वाहनांवर सातत्याने कारवाई केली जाते. अनधिकृतरित्या पार्क केलेल्या वाहनांवर सातत्याने कारवाई केली जाते. सद्यस्थितीत आझाद लेन व न्यू लिंक रोडवर कोणत्याही प्रकारची जड वाहने पार्क होत नाहीत. बर्फीवाला मार्ग रुंद असल्यामुळे रहिवाशांच्या हलक्या वाहनांमुळे वाहतूकीस अडथळा होत नाही. दादा भाई मार्गावर उभी राहणारी जड वाहने ट्यूलिप स्टार हॉटेल येथील पे ॲण्ड पार्क मध्ये उभी करण्याबाबत सूचित करण्यात आले असून अनधिकृत पार्क केलेल्या वाहनांवर भारतीय दंड विधान संहिता, कलम १४९ नुसार नोटिसा देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथे बनावट कागद पत्रावरुन विविध कंपन्यांचे दहा हजारांवर सिमकार्ड विकणाऱ्या रॅकेटवर टॉम्बे पोलिसांनी कारवाई केल्याबाबत.**

**(३६) १४७४५ (०७-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे बनावट कागद पत्रावरुन विविध कंपन्यांचे दहा हजारांवर सिमकार्ड विकण्या-या रॅकेटवर टॉम्बे पोलिसांनी कारवाई केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणात एक बड्या कंपनीचा सेल्स मॅनेजरही समाविष्ट होता, त्याची फेसबुकद्वारे परदेशातील अनेक व्यक्तीशी संपर्क असल्याची बाबही समोर आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर गुन्ह्यात टाटा डोकोमे या टेलिकॉम सेवा पुरवणाऱ्या कंपनीचे सेल्स मॅनेजर यांचा सहभाग असल्याचे स्पष्ट झाले आहे. तथापि फेसबुक द्वारे परदेशातील अनेक व्यक्तींशी त्यांचा संपर्क असल्याचे स्पष्ट झालेले नाही.

(३) सदर प्रकरणामध्ये ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे गुरक्र. २५/१५ कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४, ३४ भादंवि सह कलम ४३ (ए) (बी), (आय) (जे), ६६, ६७ माहीत व तंत्रज्ञान

कायदा २००० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आता पर्यंत १० आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुलाबा परिसरामध्ये मोठया प्रमाणावर जड व खाजगी वाहने अनधिकृतपणे उभी केली जात असल्याबाबत**

**(३७) १५१०९ (०७-०४-२०१५). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुलाबा परिसरामध्ये मोठया प्रमाणावर जड व खाजगी वाहने अनधिकृतपणे उभी केली जात असल्याचे स्थानिक रहिवाशी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी वारंवार तक्रारी दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) त्यामुळे वाहतुकीची गंभीर समस्या तसेच मुलभूत सुविधांवर अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जड व खाजगी वाहनाच्या अनधिकृत पार्किंगसंबधात शासन ठोस कारवाई करणार आहे काय,
(४) असल्यास, त्याचे स्वरुप काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१५) :**(१) होय.
(२), (३) व (४) मुंबई शहरातील वाढत्या वाहन संख्येमुळे मोठ्या प्रमाणात खाजगी वाहने रस्त्यावर अनधिकृतपणे उभी केली जातात. अशा वाहनांवर सात्याने कारवाई करण्यात येते व वाहतूकीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.
चालू वर्षामध्ये कुलाबा वाहतूक विभागाच्या हद्दीमध्ये जड व खाजगी वाहनांच्या अनधिकृत पार्किंगबाबत एकूण १५,२९९ वाहनांवर कारवाई करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना (जि.औरंगाबाद) येथील वटेश्वर ॲग्रो रिअर इस्टेट कंपनीने १११ जणांना गंडा घातल्याबाबत**

**(३८) १५८२० (०७-०४-२०१५). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना (जि.औरंगाबाद) येथील वटेश्वर ॲग्रो रिअर इस्टेट कंपनीने १११ जणांना गंडा घातल्याचा प्रकार नुकताच माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चितेगाव येथील नागरिकांची साडेतीन लाखांची फसवणूक झाल्याची तक्रार सिडको पोलीस ठाण्यात दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार दोषी व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) व (२) होय,
प्रश्नात नमूद प्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन वटेश्वर ॲग्रो ॲन्ड रीअल इस्टेट प्रा.लि. कंपनीच्या ३ संचालकाविरुध्द पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे गु.र.नं. २४/२०१५ भा.द.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे दि. २२/०१/२०१५ रोजी गुन्हा दाखल आहे.
(३) व (४) दाखल गुन्ह्याच्या तपासात १ आरोपी संचालकास अटक करुन कंपनीचे दस्ताऐवज व संगणक जप्त करण्यात आले आहेत. उपलब्ध पुराव्यावरुन कंपनीच्या संचालकांनी फिर्यादीसह १११ लोकांकडून आकर्षक परताव्याचे आमिष दाखवून त्यांची रु.६३५४५००/- ची फसवणूक केल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले आहे. इतर २ आरोपी फरार असून त्यांचा मोबाईल कॉल रेकॉर्ड मिळवून त्यांना अटक करण्याची कार्यवाही सुरु आहे. सबब प्रकरणाचा तपास सुरु आहे.

---

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील पोलीस पाटीलांची रिक्त पदे

**(३९) १५८४५ (०७-०४-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील जवळपास १२४ महत्वाच्या गावांपैकी ४० गावामध्ये पोलीस पाटलांची पदे रिक्त असल्याचे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गावा-गावांमध्ये सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून सरकारी नोक-यांकरीता आवश्यक असणारा पोलीस पाटलांचा वर्तवणूकीचा दाखला मिळणे दुरापस्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदर पोलीस पाटलांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०७-२०१५) :**(१) कल्याण तालुक्यातील १२४ गावांपैकी ३९ गावांची पदे रिक्त आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) व (४) कल्याण उपविभागनिहाय बिंदुनामावली तयार करण्याचे काम सुरु असून बिंदुनामावली अंतिम झाल्यानंतर सदर पदे भरण्यात येणार आहे.

---

**हादगांव तामसा (जि.नांदेड) या रस्त्यावर विना परवाना विक्रीसाठी आणलेला खत साठा जप्त केल्याबाबत**

**(४०) १६००३ (०७-०४-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगांव तामसा (जि.नांदेड) या रस्त्यावर कोणतेही अधिकृत कागदपत्र नसतांना विना परवाना विक्रीसाठी आणलेले पाच लाख रुपये किंमतीचा खत साठा ट्रकसह दि. ७.१.२०१५ रोजीच्या सुमारास जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) तसेच हदगांव येथे दिनांक ३० जानेवारी, २०१५ च्या सुमारास बोगस रासायनिक खताचा ट्रक पकडण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :**(१) व (२) कृषि अधिकारी व गुण नियंत्रण निरिक्षक, पंचायत समिती हादगांव यांचे तक्रारीवरुन दि.३१/०१/२०१५ रोजी अधिकृत कागदपत्र नसतांना विनापरवाना विक्रीसाठी आणलेला खताच्या बॅगा व बॉक्स व ट्रक असे एकूण रु.१८,२६९३५/- किमतीचा मुद्देमाल पकडला आहे.

(३) प्रकरणी पोलीस स्टेशन हादगांव येथे दि.३१/०१/२०१५ रोजी गु.र.नं.०५/२०१५ भा.द.वि. कलम ४२०, ३४ सह कलम ३/७ अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अॅक्ट प्रमाणे ५ आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अटक करणेवर तपासावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील बोंढार रस्त्यालगत स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यानी हैद्राबाद येथून जनावरांची चरबी विक्रीसाठी घेऊन येणारा ट्रक जप्त केल्याबाबत**

**(४१) १६००४ (०७-०४-२०१५). श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील बोंढार रस्त्यालगत स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास हैद्राबाद येथून जनावरांची चरबी वितळवून ती डालडा म्हणून विक्रीसाठी घेऊन येणारा ट्रक जप्त केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०७-२०१५) :** (१) होय,

(२) प्रकरणी ४ आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गु.र.नं. ३३/२०१५ भा.द.वि. कलम २३८, २७०, २७२, २७८, ३४ नुसार गुन्हा दाखल आहे. आरोपींना अटक करुन तपास

केला असून तपासाअंती यातील सर्व आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दि.०२/४/२०१५ रोजी दाखल केले आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**अहमदनगर जिल्हयात गेल्या १०० वर्षाहून अधिक काळ गोमाता संरक्षण व संवर्धनाचे काम करणा-या गोरक्षण पांजरापोळ संस्थेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याबाबत**

**(४२) १७३२६ (१०-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात गेल्या १०० वर्षाहून अधिक काळ गोमाता संरक्षण व संवर्धनाचे काम करणा-या गोरक्षण पांजरापोळ संस्थेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याच्या पदाधिकारी व संचालक यांच्या आर्थिक भ्रष्टाचाराने संस्था डबघाईस आली असून बाजार भावापेक्षा चढ्या भावाने गायीच्या दुधाची विक्री करुनही संस्था सातत्याने तोट्यात असल्याचे दाखविले जात असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील संस्थेत अनेक प्रकारे मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला असल्याने संस्थेच्या हिताच्या दृष्टीने रस्त्यावर उतरुन अंदोलन करण्याचा इशारा प्रसिध्द उद्योगपती नरेंद्र फिरोदिया, राजेंद्र चोपडा, आनंद बोगावत, रमेश पितळे आदीनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार व भ्रष्ट्राचार करणाऱ्यानवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०१६) :**(१) श्री. राजेंद्र चोपडा व इतर यांनी एप्रिल, २०१५ मध्ये पत्रकार परिषद घेतली होती. त्यावेळेस वर्तमानपत्रात न्यासामध्ये भ्रष्टाचार झाला आहे, अशा बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या.

(२) सन २०१४-१५ च्या लेखापरीक्षणाअंती न्यासामध्ये रुपये २६,०४,७१३ इतक्या रुपयांची तूट दिसून आली. मात्र कागदपत्र तपासली असता बाजारभावानेच दुधाची विक्री केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) श्री. राजेंद्र चोपडा व इतर यांनी दि. १३.६.२०१५ रोजी सदर संस्थेच्या काराभाराविषयीच्या कागदपत्राच्या मागणीसाठी उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता. तसेच अशा प्रकारच्या आशयाचे पत्र सन २०१२ मध्ये अहमदनगर कार्यालयात प्राप्त झाले होते.

(४) या संदर्भात अहमदनगर कार्यालयाने चौकशी केली असता संस्थेत कोणताही भ्रष्टाचार झाला असल्याचे आढळून आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकूर पंचायत समितीच्या समाज कल्याण विभागातून**
**पत्रे खरेदी व्यवहारात अपहार झाल्याबाबत**

**(४३) २६१०७ (३०-०७-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर पंचायत समितीच्या समाज कल्याण विभागातून पत्रे खरेदी व्यवहारात सात लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी दोन गटविकास अधिकारी, माजी सभापतींसह अकरा जणांविरुध्द दिनांक १० जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे, त्यात काय आढळून आले,व तद् नुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत जिल्हा परिषद, लातूर स्तरावर प्राथमिक चौकशी करण्यात आली सदर चौकशीअंती संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, साकूर येथे गुन्हा दाखज करण्यात येऊन संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) रा.म.मा. ९ ते एकोंडी (ज)**
**ते पळसगाव ते नागराळ या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४४) २६१५७ (१७-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरगा तालुक्यातील (जि.उस्मानाबाद) रा.म.मा. ९ ते एकोंडी (ज) ते पळसगाव ते नागराळ या रस्त्याची दुरवस्था झालेल्या कारणाने परिसरातील नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याबाबत व सदर रस्त्याच्या सुधारणेचे काम तातडीने हाती घेणेबाबत उमरगा-लोहारा येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे सुचित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) लखी पत्र दिले आहे.
(२) व (३) रा.म.पा ९ ते एकोंडी (ज) ते पळसगाव रस्ता हा इजिमा ११५ दर्जाचा असून त्यांची एकूण लांबी १२.६० कि.मी. इतकी आहे.

सदर लांबीपैकी ०/१०० ते ०/५०० लांबीतील रस्त्यांच्या दुरुस्तीचे जिल्हा वार्षिक योजना राज्य मार्ग निधी अंतर्गत रु.१०.०० लक्ष किंमतीचे काम पुर्ण करण्यात आले आहे. कि. मी ६/०० ते ६/५०० या भागाचे डांबरी नुतनीकरणाचे काम मार्च २०१३ मध्ये ६/०० ते ६/५०० ते १२/६०० या एकूण ११.६०० कि.मी. लांबीची दुरुस्ती आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणाऱ्या निधी व निकषाचा अधिनतेने सदरचे काम प्राधान्य क्रमाने उचित योजनेतून हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**जळगांव जिल्हयातील गिरणा हव मन्याड हया जुन्या प्रकल्पाच्या कालवे व प्रकल्प दुरुस्तीसाठी योजना राबविण्याबाबत**

**(४५) २६२८४ (१७-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील गिरणा हव मन्याड हे १९६० च्या दशकातील जुन्या प्रकल्पाच्या कालवे व प्रकल्प दुरुस्तीसाठी खास योजना राबवून प्रकल्प पाणी वापर संस्थांना हस्तांतरित करण्यात आली अशी मागणी दिनांक १९ मे, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी एक प्रस्ताव पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणी संदर्भात कोणता निर्णय घेतला आहे व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-१०-२०१५) :**(१) होय.
(२) विशेष दुरुस्ती व विस्तार व सुधारणा अंतर्गत प्रस्तूत कामे करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असणा-या कर्मचा-यांना सोयीसुविधा मिळण्याबाबत**

**(४६) २६३०४ (१७-०८-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण व संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुकयातील ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कर्मचा-यांना किमान वेतन, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी, सेवा पुस्तक भरणे आदी बाबींची अंमलबजावणी होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंमलबजावणी अभावी संबधीत ग्रामपंचायत कर्मचा-यांचे नुकसान होत असल्याने त्यांनी याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०७-१०-२०१५) :**(१) अंशतः खरे आहे.

चिपळून तसेच संगमेश्वर तालुक्यातील ग्रामपंचायत अंतर्गत असणा-या सर्व कर्मचा-यांना किमान वेतन दिले जात आहे. आर्थिकदृष्टया सक्षम असलेल्या चिपळून तालुक्यातील १३० ग्रामपंचायतीपैकी ३५ ग्रामपंचायतींना तसेच संगमेश्वर तालुक्यातील १२६ ग्रामपंचायतीपैकी ४५ ग्रामपंचायतींना महागाई भत्ता/विशेष भत्ता दिला जात आहे. तसेच सर्व ग्रामपंचायतींमधील कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी कपात करण्यात येत असून त्यांची सेवांपुस्तके देखील अद्यावत करण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत तालुका स्तरावरुन ग्रामपंचायतींना कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी कपात करणे, सेवापुस्तके अद्यावत करणे तसेच ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी आहे त्या ग्रामपंचायतींना उत्पन्न वाढविण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगांव) पंचायत समिती अंतर्गत १३ व्या वित्त आयोग तसेच शेषफंड अनुदान रक्कमेचे समान निधीचा वाटप करण्याबाबत**

**(४७) २६४३८ (१७-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव जिल्हा जळगांव पंचायत समिती अंतर्गत १३ व्या वित्त आयोग तसेच शेषफंड अनुदान रक्कमेचे समान निधीची वाटप करण्यात आले नसल्याने या संदर्भात मोठ्या प्रमाणत नुकसान झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी कशा प्रकारे वितरीत केला आहे याबाबतचे पंचायत समितीच्या मासिक सभेचा अहवाल देण्यात आहे अशी मागणी पंचायत समिती सदस्या (करगाव गण) सौ.सुवर्णा धनंजय मांडोळे यांनी दिनांक ५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, चाळीसगाव यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इतिवृत्तीची प्रत त्याना अद्यापही देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-१०-२०१५) :**(१) हे खरे नाही.
(२) याबाबतीत प्रत्येक मागील सभेच्या इतिवृत्ताची प्रत पुढील महिन्यांच्या मासिक सभेच्या कार्यसूचीसोबत सदस्यांना पुरविण्यात येते. तसेच मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम

करण्याकरिता देखील सर्व सदस्यांना मागील मासीक सभेच्या इतिवृत्तांची प्रत पुरविण्यात येते. त्यानुषंगाने सर्व सदस्यांना इतिवृत्ताची प्रत पुरविण्यात आलेली आहे. याबाबतीत पंचायत समितीच्या कोणत्याही सदस्यांनी विरोध केलेला नाही अथवा अशी तक्रार देखील केलेली नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने सुरु केलेल्या रोजगार हमी योजनेतील सुमारे ७०० कामे अपूर्ण असून यात जालना जिल्ह्यंतील १७ कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४८) २६५८५ (१७-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सुरु केलेल्या रोजगार हमी योजनेतील सुमारे ७०० कामे अपूर्ण असून यात जालना जिल्ह्यंती १७ कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची कामे प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ही कामे तातडीने पूर्ण करण्याकरिता तसेच स्थानिकांना कामे उपलब्ध करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-१०-२०१५) :**(१) होय.

जालना जिल्ह्यातील जुन्या रोजगार हमी योजनेतील १७ कामे प्रलंबित होती. त्यापैकी २ कामे रोहयोतून पूर्ण करणे शक्य नसल्याने दि. २०.८.२०१४ रोजी वगळण्यात आली आहेत. तर उर्वरित १५ कामे प्रलंबित आहेत.

(२) सदर कामे प्रलंबित असण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

१- काम न्यायप्रविष्ट

१- काम वनहरकतीमुळे

१०- कामे शेतकरी / स्थानिकांच्या विरोधामुळे

३- कामे प्रगतीपथावर

(३) व (४) सदर कामांचे अकुशल मंजुरी भाग पूर्ण झाले आहेत. त्यामुळे या कामात स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न नाही. उर्वरित कामे ही कुशल कामे आहेत. जी कामे भूसंपादनाअभावी प्रलंबित आहेत. अशा प्रकरणाची भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे.

---

**इंदीरा आवास घरकुल योजनेअंतर्गत मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सुमारे १२०० लाभार्थ्यांच्या यादीस मंजूरी मिळण्याबाबत**

**(४९) २६७४८ (१७-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदीरा आवास घरकुल योजनेअंतर्गत मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील सुमारे १२०० लाभार्थ्यांनी घरे उभारुन दोन वर्षाचा कालावधी लोटला, तरी अद्यापपर्यंत शासनाने सदर

लाभार्थ्यांच्या यादीस मंजूरी न दिल्याने लाभार्थी कर्जबाजारी झाले असल्याची गंभीर बाब माहे जून, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या कार्यालयाच्या पथकाने सदर घरकुलांची पहाणी देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पहाणीत काय आढळून आले आहे आणि सदरहू घरकुलांना तातडीने मंजूरी मिळण्याबाबत शासनाने आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर घरकुलांच्या मंजूरीस अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१४-१०-२०१५) :**(१) होय.

तथापि, इंदिरा आवास योजनेंअंतर्गत मालवण, जि.सिंधुदुर्ग तालुक्यातील १२०० घरकुले नूसन केवळ १९७ घरकुलांच्या संदर्भातील बाब आहे.

(२) होय.

(३) जिल्हा स्तरावरुन पडताळणी केली असता गट विकास अधिकारी, मालवण यांनी इंदिरा आवास योजनेअंतर्गत मंजूर केलेल्या २७० घरकुनलांपैकी १९७ घरकुले विभागीय आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रतिक्षा यादीमधील नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. सद्य:स्थितीत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी त्यांच्या दिनांक २३.७.२०१५ पत्रान्वये १९७ घरकुलांच्या सुधारित यादीस मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे या १९७ घरकुलांचे अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) होय.

श्री.राजेंद्र अनंत पराडकर, तत्कालीन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मालवण यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ नुसार शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत

**(५०) २६८१६ (१७-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये दुरुस्ती होण्याची बाब केंद्र शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आजतागायत कशाप्रकारे पाठपुरावा केला वा करण्यात येत ओह,

(३) नसल्यास, पाठपुरावा न करण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य घटनेच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दिनांक १२ मार्च, १९८९ रोजी कोकणातील स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबतचा ठराव एकमताने मंजूर केला. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावरुन दिनांक २१ एप्रिल, १९८९ रोजीच्या पत्रान्वये कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठवून भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३७१(२) मध्ये दुरुस्ती करण्याची विनंती करण्यात आली आहे. तद्नंतर याप्रकरणी वेळोवेळी केंद्र शासनसकडे पाठपुरावा करण्यात आला असून अलीकडे, मा.मंत्री, वित्त व नियोजन, वने यांनी दिनांक १२ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती मा. केंद्रीय गृह मंत्री महोदयांना विनंती केली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.